# <u>आचार्य पदवी परीक्षेच्या (PET) तारखा घोषित</u>

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी प्रवेश परीक्षा (पेट) चे आयोजनाचा कार्यक्रम निश्चीत झाला असून सदर परीक्षा येत्या २३,२४ व २५ जानेवारी २०१८ या कालावधीत संपन्न होणार आहे. सदर परीक्षेचे आयोजन नियम क्र १/२०१७ नुसार करण्यात येत असून सदर परीक्षा परीक्षार्थ्याचे सोयीकरीता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील अमरावती,यवतमाळ,अकोला,शेगाव आणि वाशिम या ठिकाणच्या केंद्रावर प्रथमच  आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षा दररोज तीन शिफट मध्ये आयोजित केलेली आहे.सकाळी ९.०० ते ११.००,दुपारी १२.३० ते २.३० आणि दुपारी ४.०० ते ६.०० अशी शिफट असणार आहे.सदर परीक्षेचे दोन पेपर असतील. पहिला सामान्य ज्ञानावर आधारीत तर दुसरा संबंधीत पदव्यूत्तर विषयाच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल.बहुपर्यायी प्रश्न असे प्रश्नांचे स्वरुप असणार आहे.

पेट परीक्षेकरीता विहित शुल्कासह अर्ज सादर केलेल्या ६७१८ परीक्षार्थ्यांना त्यांचे प्रवेशपत्र दिनांक   १० जानेवारी  पर्यंत त्यांनी अर्ज सादर केलेल्या पोर्टलवरच ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येणार असून अर्जात नमूद भ्रमणध्वनीवर देखील यासंदर्भात लवकरच सूचीत करण्यात येणार आहे. अधिक माहितीकरीता आचार्य कक्षाचे सहायक कुलसचिव श्री सुजय बंड यांचेशी भ्रमणध्वनी क्र ९०११९०४४४० वर संपर्क साधावा.